तात्काळ / कालमर्यादित

# महाराष्ट्र शासन

## शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय

१७ डॉ बाबासाहेब आंबेडकर रोड, लालदेऊळाजवळ, पुणे-१

दूरध्वनी क्रमांक०२०-२६१२५६९१ | फॅक्स नं.- ०२०-२६१२२२२०

ई-मेल आय डी :- dydpune@gmail.com | वेब साईट आय डी :- www.dydepune.com

जा.क्र./शिउसं/शिष्य./उमाशि ४/पुवि/१७-१८/ ८२८० — दि. १५/१२/२०१७.

21 DEC 2017

प्रति,

प्राचार्य,

सर्व अनुदानित उच्च माध्यमिक विद्यालये

तसेच अनुदानित कनिष्ठ महाविद्यालये,

पुणे / सोलापूर / अहमदनगर.

**विषय:-सन २०१७-१८ करीता MAHADBT महाडिबीटी पोर्टल वरील योजनेची माहिती ऑनलाईन पध्दतीने भरण्याऐवजी ऑफ लाईन पध्दतीने योजना राबविणेबाबत.**

संदर्भ:-मा. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. शिष्य./१७-१८/ डीबीटी/अंमलबजावणी/२२४/ दि. १३.१२.२०१७ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भिय पत्राचे विषयानुसार आपणांस सर्वांना कळविण्यांत येते की, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षासाठी ऑनलाईन स्कॉलरशिपच्या MAHADBT या ऑनलाईन पोर्टलचे कामकाज सद्या चालु असल्याने, खालील नमूद केलेले शिष्यवृत्ती योजनांचे विद्यार्थ्यांची आवेदन पत्रे ऑफ लाईन पध्दतीने स्विकारण्याचे संदर्भिय पत्रात सूचित केलेले आहेत.

१. कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना देण्यात येणारी शासकीय खुली गुणवत्ता शिष्यवृत्ती.
२. संस्कृत शिष्यवृत्ती.

दरवर्षीप्रमाणे उपरोक्त शिष्यवृत्ती योजनांचे विद्यार्थ्यांची आवेदनपत्रे तसेच त्यांची संक्षिप्त माहिती खालीलप्रमाणे विहित नमून्यातील प्रपत्रात Times New Roman या इंग्रजी फॉट मध्ये व एक्सेल शिट मध्ये विद्यार्थ्यांच्या नावानिशी मार्कासह सॉफ्ट कॉपी सी डी सह व अर्जाची हार्ड कॉपी असे दोन्ही पध्दतीने प्रस्तुत कार्यालयात श्री.वि.अ.साळुंखे, लिपिक यांचेकडे दि. १५.०१.२०१८ पर्यंत हस्तेपोच सादर करावीत, विलंब झाल्यास अथवा विद्यार्थी स्कॉलरशिप मिळण्यापासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित प्राचार्यांची राहील. याची कृपया आपण नोंद घ्यावी.

| Sr.No. | Name of the Jr. College | Name of the Students | STD. | Marks | Percent | Remarks |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |

M.Raut 21.12.17

(मिनाक्षी राऊत)

सहा.शिक्षण संचालक,

शिक्षण उपसंचालक,

पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालय

सोबत :- संदर्भिय पत्राची प्रत.

प्रत:- माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सविनय सादर.

मा. शिक्षण संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीस्तव:- शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद,पुणे/सोलापूर/अहमदनगर.

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग पुणे -१, यांचे कार्यालय

21 DEC 2017

जावक क्र ८२८०